www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

Test Booklet No.
परीक्षा पुस्तिका संख्या

This Booklet contains **20** pages.
इस पुस्तिका में 20 पृष्ठ हैं ।

JPC14–II

PAPER II / प्रश्न-पत्र II
PART IV & V / भाग IV & V
Marathi Language Supplement
मराठी भाषा परिशिष्ट

Test Booklet Code
परीक्षा पुस्तिका संकेत

Q

Do not open this Test Booklet until you are asked to do so.
इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।
Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.
इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।

For instructions in Marathi see Page 2 of this booklet. / मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें ।

INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Lauguage II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **or** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue/Black Ball Point Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **Q**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V consisting of **60** Objective Type Questions, and each carries 1 mark :
   Part IV : Language I – (Marathi) *(Q. Nos. 91 – 120)*
   Part V : Language II – (Marathi) *(Q. Nos. 121 – 150)*
7. Part IV contains 30 questions for Language I and Part V contains 30 questions for Language II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. ***In case the language(s) you have opted for as Language I and/or Language II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.***
8. **Candidates are required to attempt questions in Part V (Language II) in a language other than the one *chosen as* Language I (in Part IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **Q**. यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य प्रश्न पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में दो भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, तथा प्रत्येक 1 अंक का है :
   भाग IV : भाषा I – (मराठी) *(प्रश्न सं. 91 – 120)*
   भाग V : भाषा II – (मराठी) *(प्रश्न सं. 121 – 150)*
7. भाग IV में भाषा I के लिए 30 प्रश्न और भाग V में भाषा II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा I और/या भाषा II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिएँ ।**
8. **परीक्षार्थी भाग V (भाषा II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

SEAL

Name of the Candidate (in Capitals) : _____
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) :
Roll Number (अनुक्रमांक) : in figures (अंकों में) _____
: in words (शब्दों में) _____

Centre of Examination (in Capitals) : _____
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) :
Candidate's Signature : _____ Invigilator's Signature : _____
परीक्षार्थी के हस्ताक्षर : निरीक्षक के हस्ताक्षर :
Facsimile signature stamp of Centre Superintendent _____

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

ही पुस्तिका 20 पृष्ठ आहे.

JPC14–II

प्रश्नपत्रिका II

भाग IV आणि V

मराठी भाषा पुरवणी

चाचणी पुस्तिका कोड

Q

ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.

या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.

परीक्षार्थींसाठी सूचना :

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग चौथा (भाषा पहिली) **किंवा** भाग पाचवा (भाषा दुसरी) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग पहिला आणि भाग दुसरा **किंवा** तिसरा सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग चौथा आणि पाचवा सोडवायचा आहे.
3. भाग चौथा आणि पाचवा यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड Q** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल त. परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत चौथा आणि पाचवा असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   भाग चौथा : भाषा पहिली – (मराठी) *(प्र. 91 ते 120)*

   भाग पाचवा : भाषा दुसरी – (मराठी) *(प्र. 121 ते 150)*
7. भाग चौथा मध्ये भाषा पहिली साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग पाचवा मध्ये भाषा दुसरी साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा पहिली व/वा भाषा दूसरी साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग पाचवा (भाषा दुसरी) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा पहिली (चौथ्या भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : _____

अनुक्रमांक : अंकांमध्ये _____

: शब्दांमध्ये _____

परीक्षाकेंद्र : _____

परीक्षार्थीची सही : _____

पर्यवेक्षकाची सही : _____

Facsimile signature stamp of

Centre Superintendent _____

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

परीक्षार्थींनी जर **भाषा पहिली** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

भाग IV
भाषा I
मराठी

सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्र. 91 ते 99 साठी योग्य पर्यायाची निवड करा.

कोसबाडचे वारली म्हणजे अभिजात आदिवासी. त्यांच्या मुलांना पकडणं म्हणजे मुठीत वारा पकडण्यासारखं होतं. प्रचंड खडकासमोर उभं राहून आपण त्याला साद घातली म्हणजे आपले हताश शब्द तेवढेच आपल्याकडं परत येतात; खडकावर त्यांचा काही परिणाम होत नाही. इथली परिस्थिती अशीच दुस्तर होती.

शिक्षणापासून वंचित असलेल्या, एवढंच नव्हे तर त्याच्याशी शत्रुत्व करणाऱ्या या मुलांना आपण 'शिकत' आहोत असं वाटू न देता तेच त्यांच्या गळी उतरवण्याचा हा लोकविलक्षण खटाटोप होता. अनुताईंचा 'अनौपचारिक' अभ्यासक्रम गाणी, गप्पा, खेळ, ओढ्यात आंघोळी, फुलं जमा करणं, मारलेला साप अस्थिपंजर झाला म्हणजे त्याचं निरीक्षण करणं, एकाच वेळी दगड आणि चिंचोका जमिनीत पुरून त्यांपैकी कशात जीव आहे. हे ठरवणं, ओहोळावरून उडी मारण्याच्या खेळात काठीनं त्याची लांबी मोजणं, झाडाच्या सावलीची रेषा बदलताना तीवर तासातासानं खुणेचा दगड ठेवणं, भाजलेल्या पाखराच्या मांसाचा तुकडा डाळीएवढा पदरात पडला तरी सगळ्यांनी वाटून खाणं, बकरीचं मोठ्या समारंभानं नाव ठेवणं — इत्यादी मजेदार गोष्टींतून फुलत गेला आणि सृष्टिज्ञान, भूगोल, जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, अंकगणित, कालमापन, स्वच्छता, सहकार इत्यादींचे धडे मुलांना आपोआप मिळत गेले. 'शाळा म्हणजे मुलांच्या अंगणातलं झाड झालं पाहिजे' ह्या साध्या शब्दांत अनुताईंनी आपल्या शैक्षणिक पद्धतीमागचं तत्त्वज्ञान साररूपानं सांगितलं आहे. 'गाण्याचं झाड झालं पाहिजे' असं महाराष्ट्राचे आद्य ख्यालिये बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर म्हणत. त्यांच्यानंतर झाडाची इतकी सार्थ उपमा देणाऱ्या दुसऱ्या अनुताईच असाव्यात !

ताराबाई – अनुताईंचं काम पायाभरणी करणारांचं होतं. त्यांना मिळालेलं यश चिमूटभर आहे असं कोणी म्हणेल. पण शिवाजीचं राज्यही चिमूटभरच नव्हतं का ? तरीही त्याच्या कार्याचं 'केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली' असं मार्मिक मूल्यमापन अमात्यांनी केलं आणि आजचा इतिहासज्ञही हा अभिप्राय शिरोधार्य मानतो. जिथं काहीच नव्हतं अशा बरड माळावर आठशे आदिवासी मुलांच्या शिक्षणाची बागशाही फुलवणं म्हणजे नूतन सृष्टी निर्माण केल्यासारखंच आहे.

बालशिक्षणाचा संदेश ज्या ज्या मार्गांनी आणि ज्या ज्या दिशांनी पोचविता येईल ते ते मार्ग आणि दिशा त्यांनी चोखाळल्या. डहाणू भागातच महालक्ष्मी म्हणून एक स्थान आहे. तिथल्या जत्रेला हजारो स्त्रीपुरुष येतात. पोरंबाळं कडेखांद्यावर असतात आणि बायाबापड्या तासन्‌तास उन्हातान्हांत ताटकळत असतात. ह्यांची मुलं आपण संभाळली तर ? कल्पना येताच बेत ठरला आणि एक जागा घेऊन तिथं पंधरा दिवसांसाठी पाळणाघर आणि बालवाडी उभारण्यात आली. मुलं दिसली की अनुताई फुलतात आणि त्यांच्यांत मानव्याची ज्योत त्या फुलवू बघतात. ह्यावाचून त्यांना चैनच पडत नाही. एकदा कृष्णाबाई मोटे म्हणाल्या होत्या; "आमच्या अनुताई आगगाडीत बसल्या तरी बालवाडी चालवतील."

मी व माझे मित्र प्रा. वसंत देशपांडे एकदा एका मोठ्या भाग्याचे धनी झालो. अनुताईंच्यासह आम्ही एकदा बोर्डी, दरजीवाडी, डोंगरीपाडा, मानकरपाडा, चिवावे वगैरे ठिकाणांची सहल केली. त्या वेळची दृश्यं आमच्या मनांत अजून तरळतात आणि त्या आठवणी मनःसंपुटात साठवून त्यांच्याभोवती मनाला रुंजी घालू द्यावं असं पुनः पुन्हा वाटतं.

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

91. प्रचंड खडकासमोर उभं राहून आपण त्याला साद घातली म्हणजे

(1) वारलींची मुले पळत येतात

(2) तिथल्या परिस्थितीचा अंदाज येतो

(3) खडकावर त्याचा परिणाम होतो

(4) आपले हताश शब्द आपल्याकडं परत येतात

92. लेखक कसला लोकविलक्षण खटाटोप करीत होते ?

(1) पर्यावरण संरक्षणाचे काम करीत होते

(2) आदिवासी मुलांना शिकवीत होते

(3) आदिवासी मुलांचे रंजन करीत होते

(4) आदिवासी परिसराचा अभ्यास करीत होते

93. लेखकाच्या मते अनुताईंचा अनौपचारिक अभ्यासक्रम

(1) अनेक मजेदार गोष्टीतून फुलत गेला

(2) आपोआपच आकारास आला

(3) फार परिश्रमातून साकार झाला

(4) अनेक पुस्तकांच्या आधारे तयार झाला

94. अनुताईंच्या म्हणण्याप्रमाणे शाळा म्हणजे

(1) अभ्यास, अभ्यासक्रम इत्यादी

(2) शिक्षक, धडे, फळा

(3) विविध विषयांचे सक्तीचे ज्ञान

(4) मुलांच्या अंगणातले झाड

95. ताराबाई – अनुताईंचे काम हे

(1) मुलांना औपचारिक शिक्षण देण्याचे होते

(2) मुलांची करमणूक करण्याचे होते

(3) पायाभरणी करणाराचं होतं

(4) शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचं होतं

96. ताराबाई – अनुताईंनी बालशिक्षणाचा संदेश पोचविण्यासाठी

(1) घरोघरी जाऊन औपचारिक चर्चा केली

(2) वर्गात मुलांना शिकविले

(3) विविध मार्ग आणि दिशा चोखाळल्या

(4) व्यावहारिक शिक्षणावर भर दिला

97. अनुताईंच्या औपचारिक शिक्षणात भाजलेल्या पाखराचा डाळीएवढा तुकडा पदरात पडला

(1) तर पटकन टाकून देणे हे असे

(2) आणखीन मिळू शकतो का हे पाहणे असे

(3) कमी मिळाला म्हणून तक्रार करणे हे असे

(4) सगळ्यांनी मिळून खाणे हे असे

98. डहाणू भागात काय आहे ?

(1) महालक्ष्मीचे स्थान

(2) बंदर

(3) समुद्र किनारा

(4) चिकूच्या बागा

99. बाळकृष्णबुवांनंतर झाडाची इतकी सार्थ उपमा देणाऱ्या याच होत

(1) ताराबाई

(2) अनुताई

(3) लेखक स्वतः

(4) दुसरा कोणीतरी

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

सूचना : पुढील पद्यांश वाचा आणि प्रश्न क्र. 100 ते 105 साठी योग्य पर्यायाची निवड करा.

स्त्रीपुरुषें सर्व कष्टकरी व्हावें ।। कुटुंबा पोसावें ।।
आनंदाने ।। ध्रु ।।

नित्य मुलीमुलां शाळेंत घालावें ।। अन्नदान द्यावें ।।
विद्यार्थ्यास ।। 2 ।।

सार्वभौम सत्य स्वतः आचरावें ।। सुखे वागवावें ।।
पंगु लोकां ।। 3 ।।

अशा वर्तनानें सर्वा सुख द्याल ।। स्वतः सुखी व्हाल ।।
जोती म्हणे ।। 4 ।।

सर्वांचा निर्मीक आहे एक धनी ।। त्याचें भय मनीं ।।
धरा सर्व ।। ध्रु ।।

न्यायानें वस्तूचा उपभोग घ्यावा ।। आनंद करावा ।।
भांडू नये ।। 2 ।।

धर्म राज्य भेद मानवा नसावे ।। सत्यानें वर्तावें ।।
ईशासाठीं ।। 3 ।।

सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतो ।। मनुजा सांगतों ।।
जोती म्हणे ।। 4 ।।

100. कवी सर्व स्त्री-पुरुषांना काय होण्यास आवाहन करीत आहेत ?

(1) आरामप्रिय

(2) शेतकरी

(3) कष्टकरी

(4) चाकरदार

101. मुलामुलींना शाळेत पाठविण्याव्यतिरिक्त काय अपेक्षित आहे ?

(1) जुन्या चालीरितींचे पालन

(2) विद्यार्थ्यांना अन्नदान

(3) वर्णव्यवस्थेचे पालन

(4) उच्चनीचता

102. जोतिरावांच्या मते आपले आचरण कसे असावे ?

(1) स्वार्थी

(2) शंकेखोर

(3) आळशी

(4) सार्वभौम सत्याचे अनुपालन करणारे

103. कोणाचे भय मनात धरावे, असे कवी म्हणतात ?

(1) निर्मिकाचे

(2) पोलिसाचे

(3) पुढाऱ्यांचे

(4) लोकांचे

104. वस्तूंचा उपभोग कसा करावा, असे कवीला वाटते ?

(1) न्यायाने

(2) वाटेल तसा

(3) आवडेल तसा

(4) गरजेपेक्षा जास्त

105. कवीच्या म्हणण्याप्रमाणे परस्परांनी कसे राहावे ?

(1) तुसडेपणा करावा

(2) वाद करावा

(3) आनंद करावा

(4) प्रतिवाद करावा

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

सूचना : अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची (प्रश्न क्र. 106 ते 120) उत्तरे द्या.

106. भाषा ग्रहण क्षमता ही उपजत असून, मानव प्राणी भावी आयुष्यात तो बोलणार असणारी भाषा घेऊनच जन्माला येतो, असे प्रतिपादन करणारी पद्धती

(1) संज्ञान पद्धती

(2) नैसर्गिक पद्धती

(3) सहजसंवाद पद्धती

(4) घटना पद्धती

107. विद्यार्थी केंद्रित वर्गाचे वैशिष्ट्य

(1) विद्यार्थी वर्गाच्या मध्यभागी बसतात.

(2) शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी परस्परांना शिकवितात.

(3) शिक्षक उत्साही व विद्यार्थी सक्रिय असतात.

(4) विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम सुरू असतात.

108. वर्गामध्ये भाषा विषयाचा मर्यादित सराव करून घ्यावयाचा असल्यास वापरावयाचा उपक्रम

(1) नाट्यीकरण, भूमिका वठविणे.

(2) चर्चा सत्र, गट चर्चा.

(3) शिकविलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून व्यक्तिगत वाचन.

(4) पाठांतर आणि रिकाम्या जागा भरा प्रश्न.

109. निरनिराळे आवाज ऐकणे आणि त्यापासून अर्थ काढणे, ही प्रक्रिया _____ प्रक्रिया आहे.

(1) लेखन

(2) उच्चारण

(3) श्रवण

(4) वाचन

110. एखाद्या मुद्द्याच्या संदर्भात व्याकरणदृष्ट्या अचूक, सुसंगत माहिती (वाक्ये) तयार करणे आणि ती अचूक साध्या भाषेत सांगणे ही क्रिया _____ या प्रक्रियेच्या मूल्यमापनाचा भाग आहे.

(1) बोलणे

(2) लिहीणे

(3) ऐकणे

(4) सृजनशीलता

111. शिक्षक सार्वजनिक ठिकाणी केल्या जाणाऱ्या उद्घोषणांमध्ये वापरण्यात येणाऱ्या व्याकरणात्मक रचनेची ध्वनिफीत विद्यार्थ्यांना ऐकवितात. ती ऐकून विद्यार्थी प्रश्नोत्तररूपात काय उद्घोषणा केली, त्याचा सराव करतात.

या पद्धतीस _____ पद्धती असे म्हणतात.

(1) संरचनात्मक

(2) सहजसंवादी

(3) अनुवाद

(4) संक्रामक

112. व्याकरण अध्यापनाच्या बाबतीत खालीलपैकी अचूक दृष्टिकोण कोणता ?

(1) व्याकरण संरचना सरावासाठी पाठांतराची गरज असते.

(2) व्याकरणांच्या नियमांमुळे संपर्क कौशल्यावर मर्यादा येतात.

(3) व्याकरणाचे नियम पक्के होण्यासाठी फक्त लेखन पद्धतीच उत्तम आहे.

(4) विद्यार्थ्यांने व्याकरणाचे नियम स्वतःच शोधून काढावेत.

113. पूर्वकथन हे खाली दिलेल्यापैकी कशाचे उपकौशल्य आहे ?

(1) सारांशलेखन

(2) नोंदी घेणे

(3) वाचन

(4) मसुदा तयार करणे

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

114. जी मुले संभाषण आणि भाषा यामध्ये कमकुवत आहेत, ती खालीलपैकी कोणत्या उपक्रमाने प्रेरित होतील ?

(1) शिक्षकाने वारंवार दुरुस्त्या सुचवून.

(2) त्यांचे संभाषण ध्वनीमुद्रित करून आणि त्याचे विश्लेषण करून.

(3) त्यांना परस्परांशी संभाषण करण्यास उत्तेजन देऊन.

(4) संभाषण उपचार तज्ञाला लक्ष घालण्यास सांगून.

115. सुधार शिक्षण म्हणजे

(1) अध्यापनातील त्रुटी भरून काढणे.

(2) शाळा सुटल्यानंतर जास्त वेळशिकविणे.

(3) हुशार विद्यार्थ्यांची प्रगती होण्यास मदत करणे.

(4) विद्यार्थ्यांच्या मधून मधून चाचण्या घेणे.

116. पाठ्यक्रमातील माहितीवरून निष्कर्ष काढणे, शब्दार्थ ओळखणे, शब्द शोधणे आणि शब्दसंग्रह या क्षमतांचे मूल्यमापन करण्यासाठी _____ ही पद्धती वापरतात.

(1) आकलनात्मक वाचन

(2) भावनिक प्रतिसाद

(3) संकल्पना तोंडी सांगणे

(4) विशिष्ट माहिती ऐकणे

117. माहिती सांगितल्यानंतर किंवा लिहून दिल्यानंतर त्याचा प्रतिसाद लक्षात घेऊन मुलांना प्रभावशाली अध्ययनप्रक्रियेत गुंतविण्यासाठी _____ चा उपयोग होतो.

(1) सत्रचाचण्या

(2) संस्कारक्षम मूल्यमापन

(3) सारांश मूल्यमापन

(4) वार्षिक परीक्षा

118. खालीलपैकी कोणत्या उपायाने विद्यार्थ्याला त्याच्या स्वतःच्या अध्ययनाबाबत जबाबदार बनविता येईल ?

(1) विद्यार्थ्याला स्वतःचे अध्ययन उत्तमपणे करण्यासाठी निर्णय घेण्यापासून परावृत्त करणे.

(2) चॅटींग आणि नेटवर्क हे तंत्रज्ञान वापरणे.

(3) विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रश्न विचारण्यास उद्युक्त करणे.

(4) विद्यार्थ्याचे भाषाकौशल्य वाढावे म्हणून त्यांना भरपूर गृहपाठ, प्रकल्पकार्य आणि स्वाध्याय देणे.

119. सहजसंवादी भाषा अध्यापन हे कशाशी संबंधित आहे ?

(1) शुद्धलेखन आणि व्याकरणाचे नियम वापरून शब्दसंग्रह (पाठ्यक्रम) आणि व्याकरण शिकविणे.

(2) विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेच्या दृष्टीने भाषा शिकविणे.

(3) विद्यार्थ्यांना सहजपणे समजतील अशा पद्धतीने व्याकरणाचे नियम शिकविणे.

(4) विद्यार्थ्यांची संभाषण, श्रवण, वाचन आणि लेखन ही ग्रहणशील आणि फलदायी कौशल्ये वाढविणे.

120. काही विद्यार्थ्यांना शब्दांचे अर्थ समजत नाहीत किंवा शब्दांचा अचूक वापर करता येत नाही. त्यासाठी करावी लागणारी उपाययोजना

(1) चुका दाखविणे व त्या दुरुस्त करून घेणे.

(2) विद्यार्थ्यांचे मुख्य शब्दाकडे लक्ष वेधणे व त्याबरोबर कोणते शब्द येतात, ते पाहण्यास सांगणे.

(3) विद्यार्थ्यांना शब्दार्थ सांगणे आणि त्यांचा वापर करण्यास सांगणे.

(4) वाचन आणि लेखन यांच्या सरावासाठी जास्त तास घेणे.

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

परीक्षार्थींनी जर **भाषा दुसरी** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

भाग V
भाषा II
मराठी

सूचना : *पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्र. 121 ते 129 साठी योग्य पर्यायाची निवड करा.*

पळसाला जसा आकार नाही तसाच त्याच्या सुंदर फुलांना गंधही नाही. फुलांचा बहर संपू लागताच त्याला कोवळी पालवी फुटते. ती पाने मुंगसाच्या कानासारखी लालसर दिसतात.

पण फुललेला पळस मला आवडतो तो वेगळ्याच कारणाकरिता. पळस फुलला की गुलाबी रंगाच्या पळसमैना — रोझी पॅस्टर — यांचे थवेच्या थवे युरोप, आशिया, मध्यपूर्व प्रदेश, तुर्कस्थान ह्या भागांतून भारतातील पळसाच्या जंगलात येतात. आभाळात त्यांचे थवे पाहिले की वाटतं, ढग आले आहेत. प्रचंड किलकिलाट करीत ते फुललेल्या पळसावर उतरू लागतात. पळसाच्या फुलांत भरपूर मध असतो. तो ते प्राशन करीत असतात. पळस-मैना पळसात परपरागन अणि परफलन घडविण्याला फार साहाय्य करतात. पक्षीनिरीक्षणाचे पहिले धडे फुललेला पळस देतो. पोपट, पाणपोपट, हळदू, कोतवाल, भृंगराज, साळुंकी, मैना, बुलबुल आणि सूर्यपक्षी असे अनेक प्रकारचे पक्षी मधासाठी येत असतात. सर्वांनाच मध हवा असतोच असं नाही. काही त्या फुलांतील कीटकांसाठी येतात, तो फुलांनी बहरलेला वृक्ष मधमाश्यांच्या गुंजारवानं निनादित होतो. तो अनाकर्षक वृक्ष फुलांवरील पक्षी व मधमाश्यांच्या आवाजानं जणू गाऊ गुणगुणू लागतो. ते झाड गाणारं झाड होतं.

आपल्या आयुष्यात कुणी पळसाचं झाड लावलं अन् त्यानं त्या झाडाची फुलं पाहिली असं सहसा घडत नाही. त्याचं कारण पळसाचं झाड फार हळूहळू वाढतं. वर्षानुवर्षं ते वनवणव्यात जगत-मरत असतं. जमिनीत मुळाचा कंद होत असतो. हा कंदच पुढं आनंदकंद होऊन फुलांनी बहरून आनंद देतो. कुणी तो आवडीनं घराच्या बागेत लावत नाही. पण परवा सर एडविन ऑर्नल्डचं 'दि लाइट ऑफ एशिया' हे बुद्धाचं चरित्र वाचताना मध्येच थांबलो. सिद्धार्थची आई मायादेवी आपल्या राजवाड्याच्या उद्यानातील पळसाच्या वृक्षाखाली नित्य बसत असल्याचा उल्लेख आहे. मला पळसाविषयीची गाथा सप्तशतीतील सुंदर गाथा आठवली.

"पोपटाच्या चोचीप्रमाणं लालभडक अशा पळस-पुष्पांनी पृथ्वी शोभायमान झालेली आहे. जणू बुद्धाच्या चरणाशी वंदन करण्यासाठी लोटांगण घालणाऱ्या भिक्षुसंघाप्रमाणं हे दृश्य दिसत आहे."

पळसाची लाल नारिंगी फुलं पोपटाच्या चोचीसारखी दिसतात. म्हणून पोपटाला किंशुक हे वैकल्पिक नाव आहे. नवेगाव तळ्याकाठच्या जंगलात पिवळ्या फुलांचा पळस पाहिला, तसा पांढऱ्या फुलांचाही. हा पिवळा व पांढरा पळस फुलला की जपानी लोक चेरीची फुलं पाहायला जावेत तसा मी मुद्दाम तो फुलोरा पाहायला जात असे. आपल्याकडे अशी फुलं पाहायला जायची आवड कमी.

आपल्या संस्कृत व प्राकृत वाङ्मयात वसंतोत्सवाची विपुल वर्णनं आहेत. त्यावरून आपल्या प्राचीन जीवनातल्या निसर्गप्रेमाची साक्ष आपणाला मिळते. पण ही निसर्गपूजा जीवनातून नष्ट होऊन ग्रंथात जाऊन बसली आहे.

121. लेखकाच्या मते आकार आणि गंध नसलेले फुलझाड कोणते ?

(1) मोगरा

(2) गुलाब

(3) जाई

(4) पळस

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

122. फुललेला पळस लेखकाला आवडतो तो कोणत्या कारणासाठी ?

(1) त्याच्या फुलांना गंध नसतो म्हणून

(2) पक्षी निरीक्षणाचा पहिला धडा देतो म्हणून

(3) त्याच्या फुलांचा डौलदार आकार असतो म्हणून

(4) त्यांचा रंग आकर्षक असतो म्हणून

123. पळसावर पक्षी कशासाठी येतात ?

(1) त्याचा आकार डौलदार असतो म्हणून

(2) मधप्राशन करण्यासाठी

(3) त्याच्या फुलांना छान वास असतो म्हणून

(4) त्याला गोड फळे लागतात म्हणून

124. सिद्धार्थची आई आपल्या राजवाड्याच्या उद्यानातील कोणत्या वृक्षाखाली बसत असे ?

(1) पळसाच्या

(2) वडाच्या

(3) आंब्याच्या

(4) लिंबाच्या

125. जो पळसाचे झाड लावतो त्याला झाडाची फुले पहायला मिळतात असं सहसा घडत नाही कारण

(1) झाडाला फुले येतातच असे नाही

(2) झाडाला फार वर्षांनी फुले येतात

(3) झाड फार हळू हळू वाढते म्हणून

(4) झाडाला फुलेच येत नाहीत

126. पोपटाला किंशुक हे वैकल्पिक नाव कशामुळे दिले गेले ?

(1) पळसाची फुले पोपटाच्या चोचीसारखी असतात त्यामुळे

(2) पळसाच्या पानांचा रंग पोपटासारखा असतो म्हणून

(3) पोपटाचे वास्तव्य पळसावर असते म्हणून

(4) पोपटाला पळसाची फळे आवडतात म्हणून

127. नवेगाव तळ्याकाठच्या जंगलात कोणत्या रंगाचा पळस आढळतो ?

(1) लाल-नारिंगी

(2) निळसर रंगाचा

(3) हिरवट रंगाचा

(4) पिवळा नि पांढरा

128. आपल्या संस्कृत वाङ्मयात कशाची विपुल वर्णने आहेत ?

(1) शारदोत्सवाची

(2) शिशिरोत्सवाची

(3) श्रावणाची

(4) वसंतोत्सवाची

129. लेखकाच्या मते प्राचीन संस्कृत वाङ्मयातून कशाची साक्ष पटते ?

(1) प्राणीप्रेमाची

(2) जीवसृष्टीची

(3) निसर्गप्रेमाची

(4) मानवसभ्यतेची

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

सूचना : *पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्र. 130 ते 135 साठी योग्य पर्यायाची निवड करा.*

पेशवेकालीन पुणे आता इतिहासजमा झालेले आहे. नक्षीदार खिडक्यांचे सरदारांचे वाडे आता जमीनदोस्त होऊन तिथे ठरीव साच्याच्या सिमेंट-काँक्रीटच्या तीन-चार मजली इमारतींची जंगले उभी राहत आहेत. सदाशिवपेठ पुणे आता कारखान्यांनी वेढले गेले आहे. जिथे हत्ती-घोडे झुलत त्याच रस्त्यांवरून सायकली, हातगाड्या, काळा धूर सोडणाऱ्या मोटारी, बसेस, रिक्षा, स्कूटर्स यांची प्रचंड वर्दळ चालू आहे.

पुण्यातल्या माणसांचे जीवनही केवढे बदलून गेले आहे. मागच्या पिढीत हे पेन्शनरांचे निवांत गाव होते. गरम कपडे घालून, नक्षीच्या काठ्या घेऊन, एकमेकांची टवाळी करीत हे पेन्शनरांचे तांडे पर्वतीवर पहाटे जात असत. इंग्रजांच्या काळी रेखीवपणासाठी व उत्तम हवेसाठी हे शहर प्रसिद्ध होते. आज तेच पुणे झोपडपट्ट्यांनी भरून आणि वेढून गेले आहे. इथल्या पावलापावलांवरच्या दुथडी भरून चाललेल्या कचरापेट्या सर्वत्र कुजलेला वास पसरवीत असतात. झोपडपट्ट्यांच्या आसपास रस्त्यांवर रोज सकाळ-संध्याकाळ विष्ठेच्या आणि लघवीच्या रांगोळ्या काढल्या जातात.

गेल्या वीस वर्षांत पुण्याचा हा कायापालट झाला आहे. मुंबईची आणखी औद्योगिक वाढ होणे अशक्य झाल्यावर पुण्याला औद्योगिक शहर बनवले गेले. तेव्हापासून खेड्यापाड्यांतून इथे कंगाल माणसांची रीघ सुरू झाली. कोणी काम न मिळणारे भूमिहीन शेतमजूर होते, कोणी शेतीत न भागणारे दुष्काळी भागातले छोटे शेतकरी होते, कोणी नव्या औद्योगिक जमान्यात धंदे बसलेले बलुतेदार, कारागीर होते, तर कोणी सवर्णांच्या जुलमाला आणि दडपणाला कंटाळलेले दलित जातींचे लोक होते. या सगळ्यांचे लोट पुण्यावर आदळत राहिले.

एकसष्टच्या पुरानंतर पुण्यात खूप बांधकामे निघाल्याने बांधकाम-मजुरांची इथे मोठी आवक झाली. अडुसष्ट सालानंतर बीड, उस्मानाबाद, सोलापूर या जिल्ह्यांत सतत दुष्काळ पडत राहिला, तिथून आणि बहात्तर सालच्या मोठ्या दुष्काळात सगळ्या महाराष्ट्रातून दुष्काळग्रस्तांच्या फौजाच्या फौजा इथे आल्या आणि त्या या झोपडपट्ट्यांमधून राहू लागल्या.

आज या शहरात आणि सीमेवर झोपडपट्ट्यांचे समुद्र पसरले आहेत. आज पुणे केवळ मध्यमवर्गीय लोकांचे आणि विद्यार्थ्यांचे राहिले नाही. पावणेतीन लाख लोक गलिच्छ अशा झोपड्यांतून राहत आहेत. मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय मंडळींनी या समाजाकडे पाहायची दारेच बंद करून घेतली आहेत. 'हे लोक गरीब नाहीत; श्रीमंत आहेत; यांच्या घरात रेडिओ असतो; हे नायलॉन-टेरेलिनचे कपडे घालतात; यांच्या दारूभट्ट्या असतात; यांना सवयीच घाणेरड्या; कितीही चांगली घरे द्या, ते ती भाड्याने देऊन स्वतः परत या गलिच्छ झोपड्यांमध्येच राहायला जातात,' इत्यादी ठरलेले युक्तिवाद करून, स्वतःभोवती कुंपण घालून, हे वरचे लोक आपल्या सुस्थितीत राहण्याचे समर्थन करीत असतात आणि आपली जबाबदारी झटकीत असतात. पण ही जबाबदारी कोणाला अशीतशी झटकता यायची नाही. आपली इच्छा असो नसो, आपण सर्वच एका प्रचंड आर्थिक व सामाजिक प्रक्रियेचे भाग आहोत. या प्रक्रियेत आपल्याला जरी जगण्याची सुरक्षित साधने मिळाली असली, तरी कित्येक लोक त्यात दिवसेंदिवस बेघर, बेकार होत आहेत. ते 'जगण्या'साठी शहरात येत राहणार आहेत. इथे काहीही करून ते जगण्याचा प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या जगण्याच्या झगड्यातून इथली सांस्कृतिक मूल्ये ठरणार आहेत.

130. लेखकाच्या मते पेशवेकालीन पुण्यात

(1) सरदारांचे वाडे नव्याने उभारले आहेत

(2) अत्याधुनिकता आली आहे

(3) अधिक सुसंस्कृतता आली आहे

(4) आता इतिहासजमा झाले आहे

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

131. लेखकाच्या मते मागच्या पिढीत पुणे हे

(1) सरदारांचे गाव होते

(2) पेन्शनरांचे गाव होते

(3) कामगारांचे गाव होते

(4) कलारसिकांचे गाव होते

132. एकसष्टच्या पुरानंतर पुण्यात कोणते बदल झाले ?

(1) खूप बांधकामे निघाली

(2) माणसं पुणे सोडून निघून गेली

(3) कोणताही बदल झाला नाही

(4) नदीचा प्रवाह बदलण्यात आला

133. अडुसष्टसालानंतर कोण-कोणत्या जिल्ह्यात दुष्काळ पडला ?

(1) पुणे, सातारा, पंढरपूर

(2) नाशिक, धुळे, जळगाव

(3) बीड, उस्मानाबाद, सोलापूर

(4) नागपूर, चंद्रपूर, अकोला

134. लेखकाच्या मते कोणाच्या जगण्याच्या झगड्यातून इथली सांस्कृतिक मूल्ये ठरणार आहेत ?

(1) वाड्यातून राहणाऱ्या

(2) मध्यमवर्गीयांच्या

(3) झोपड्यातून राहणाऱ्या

(4) उच्चवर्गीयांच्या

135. एकमेकांची टवाळी करीत पेन्शनरांचे तांडे कुठे जात असत ?

(1) हनुमान टेकडी

(2) पर्वती

(3) सारसबाग

(4) जिमखाना

सूचना : *अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची (प्रश्न क्र. 136 ते 150) उत्तरे द्या.*

136. एखाद्या पाठातील एखाद्या शब्दाचे 'मूल्य' म्हणजे

(1) त्या शब्दाचा त्या संदर्भातील अचूक वापर.

(2) तो शब्द किती प्रकारे वापरता येतो.

(3) शब्दकोषातील त्या शब्दाचा अर्थ.

(4) पाठसंदर्भात त्या शब्दाला असणारे महत्त्व.

137. माहितीपर अध्ययन

(1) विद्यार्थ्यांच्या विचाराला चालना देत नाही.

(2) गप्प बसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देते.

(3) विद्यार्थ्यांमध्ये सृजनात्मक विचार निर्माण करू शकत नाही.

(4) विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देते.

138. खालीलपैकी कोणत्या प्रकाराने नाटक उत्तमरीत्या शिकविता येते ?

(1) विद्यार्थ्यांना ते नाटक बऱ्याच वेळा शांतपणे वाचावयास सांगून कथावस्तू समजावून घेण्यास सांगणे.

(2) विद्यार्थ्यांचे गट करून त्यांच्याकडून प्रत्यक्ष नाटकाचा प्रयोग करून कथावस्तू समजावून घेण्यास सांगणे.

(3) विद्यार्थ्यांना आकलन झाले की नाही, हे पाहण्यासाठी त्यांना अनेक प्रश्न विचारणे.

(4) नाटकाची कथावस्तू आणि व्याकरण यावर वेगवेगळे प्रश्न विचारून चाचणी घेणे.

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

139. द्वितीय भाषेतून दिलेल्या सूचना विद्यार्थ्यांना समजणे आवश्यक आहे. हे कौशल्य पाहण्यासाठी वापरावी लागणारी मूल्यमापन पद्धती म्हणजे

(1) यापुढे काय होणार याचा अंदाज करण्याची क्षमता.

(2) संभाषण करण्याची क्षमता.

(3) माहितीसंग्रह आणि ती माहिती अचूकपणे आठवण्याची क्षमता.

(4) माहिती विश्लेषणाची क्षमता.

140. आपल्या भाषेत सर्वात जास्त शब्द खालीलपैकी कोणत्या भाषेतून आले आहेत ?

(1) रशियन

(2) अरेबिक

(3) लॅटीन

(4) संस्कृत

141. किंचित अध्ययन अक्षमता असणारा विद्यार्थी अभ्यासातील विषयात वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या मागे पडू नये म्हणून करावी लागणारी उपाययोजना

(1) त्या विद्यार्थ्याला जास्तीत जास्त मजकूर संगणकावर देणे.

(2) त्या विद्यार्थ्याला अपरिचित असणारे शब्द हुडकून काढून त्याचा अर्थ त्याला समजावून सांगणे.

(3) फक्त अभ्यास साहित्यावरच (पाठ्यपुस्तकावरच) भर देणे.

(4) वाचनासाठी पाठ्यपुस्तकाचा ढोबळ मानाने सारांश देणे.

142. व्याकरण अध्यापनाच्या बाबतीत सर्वात जास्त ***चुकीचे*** गृहीतक कोणते ?

(1) पाठ वाचताना आणि लेखन करताना व्याकरणाचा अभ्यास करता येतो.

(2) पारंपारिक पद्धतीने फक्त व्याकरणच शिकवावे त्याचा उपयोग बोलणे व लेखन यासाठी होतो.

(3) विद्यार्थ्यांच्या लेखनातील चुका दुरुस्त करून फारसा फायदा होत नाही.

(4) व्याकरणातील गुंतागुंतीचा भाग समृद्ध वाङ्मय आणि समृद्ध भाषा यांच्याअभ्यासाने शिकता येतो.

143. विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचे मूल्यमापन करताना खालीलपैकी कोणती गोष्ट जास्त आवश्यक आहे ?

(1) विद्यार्थ्यांना विचार करण्यासाठी भरपूर संधी दिली गेली पाहिजे.

(2) विद्यार्थ्याला लिखाणानंतर चुका सांगण्यापेक्षा विद्यार्थी लिखाण करीत असतानाच त्याला चुकांची जाणीव करून दिली पाहिजे.

(3) विद्यार्थ्याला मर्यादित लेखन दिले गेले पाहिजे.

(4) व्याकरणाला जास्त महत्त्व दिले गेले पाहिजे.

144. खालील वेगवेगळ्या क्षमतेच्या गटांपैकी कोणता गट संमिश्रजातीय असतो ?

(1) लिंग आणि वय

(2) सामाजिक स्तर

(3) बुद्धि आणि कौशल्य

(4) आर्थिक स्तर

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

145. खालीलपैकी कोणता गट चार वेगवेगळ्या प्रकारच्या वाचन प्रक्रियांचा आहे ?

(1) आनंद, माहिती, बारकावा, (पुस्तक) चाळणे

(2) शोधणे, शोध लावणे, (छापील मजकूर) भरकन तपासणे, विस्तृत वाचन

(3) (पुस्तक) चाळणे, (छापील मजकूर) भरकन तपासणे, विस्तृत वाचन, सघन वाचन

(4) (पुस्तक) चाळणे, (छापील मजकूर) भरकन तपासणे, शोध लावणे, शोधणे

146. कादंबरी वाचन आणि वृत्तांत वाचन या दोन गोष्टी पूर्णपणे भिन्न गोष्टी आहेत. कादंबरी वाचकाकडे खालीलपैकी कोणती गोष्ट असणे आवश्यक आहे ?

(1) उच्च पातळीची बौद्धिक क्षमता

(2) सर्वसामान्य भावनिक प्रतिसाद

(3) उच्च पातळीची बौद्धिक क्षमता आणि सर्वसामान्य भावनिक प्रतिसाद

(4) लेखकाची शैली आणि त्याने दिलेला संदेश यांचे मूल्यमापन करण्याची क्षमता

147. तक्रार अर्जामध्ये तक्रारीचा मजकूर कोठे असला पाहिजे ?

(1) पत्राच्या सुरवातीला

(2) परिच्छेद 2 मध्ये

(3) परिच्छेद 1 मध्ये

(4) पत्राच्या शेवटी

148. विद्यार्थी केंद्रित अध्यापन प्रक्रिया कोणती ?

(1) व्यक्तिगत सूचना

(2) प्रात्यक्षिक

(3) प्रतिकृती

(4) व्याख्यान

149. जे शिकवले जाते, ते सर्वच आत्मसात होते, असे नसते. कारण

(1) शिक्षक आणि विद्यार्थी हे कधीच आपला संपूर्ण विषय आत्मसात करू शकत नाहीत.

(2) विद्यार्थी अनौपचारिक चर्चेमध्ये जास्त रस घेतात.

(3) शिक्षकाच्या आणि विद्यार्थ्याच्या आर्थिक स्तरामध्ये पुष्कळ अंतर असते.

(4) प्रत्येक विद्यार्थ्याची आकलन क्षमता, व्यक्तिमत्व भिन्न भिन्न असते. आणि ते वेगवेगळ्या सामाजिक स्तरामधून आलेले असतात.

150. वर्गात सतत अस्थिर असणाऱ्या आणि अभ्यासाकडे अजिबात लक्ष न देणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन खालीलपैकी कोणत्या चाचणीने करू नये ?

(1) बहुपर्यायी प्रश्न

(2) दीर्घोत्तरी, निबंधवजा प्रश्न

(3) आकृतींना नावे द्या, मोकळ्या जागा भरा यासारखे प्रश्न

(4) नाट्यीकरण आणि गटकार्य

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
2. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी ध्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/विची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
9. इलेक्ट्रॉनिक / हस्तसंचालित गणितयंत्रा (calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे.** ***चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

www.upscstudymaterials.com www.upscstudymaterials.com

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

SEAL

READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ball Point Pen on *Side-2 of the OMR Answer Sheet*. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet *is not folded*. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under *no circumstances (except for* discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, *bits of papers, pager,* mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
6. Each candidate must show on demand his / her Admission Card to the Invigilator.
7. *No candidate, without special permission of the* Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
8. *The candidates should not leave the Examination* Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left-hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
9. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and *Regulations of the Board.*
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room/Hall.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

निम्नलिखित निर्देश ध्यान से पढ़ें :

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के पृष्ठ-2 पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉल पॉइन्ट पेन से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
4. परीक्षा पुस्तिका/उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, काग़ज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अँगूठे का निशान हाज़िरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
9. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
10. परीक्षा-हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
11. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
12. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष/हॉल छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें ।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।***

www.upscstudymaterials.com
www.upscstudymaterials.com

P-II (SET-Q)

91	4	106	2	121	4	136	4
92	2	107	4	122	2	137	4
93	1	108	4	123	2	138	2
94	4	109	3	124	1	139	3
95	3	110	1	125	3	140	4
96	3	111	2	126	1	141	2
97	4	112	4	127	4	142	2
98	1	113	3	128	4	143	2
99	2	114	3	129	3	144	3
100	3	115	1	130	4	145	3
101	2	116	1	131	2	146	4
102	4	117	2	132	1	147	2
103	1	118	3	133	3	148	1
104	1	119	4	134	3	149	4
105	3	120	2	135	2	150	2

www.upscstudymaterials.com